# मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान

## आशालता नारायण खोत

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, देवचंद कॉलेज,अर्जुननगर.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259620

## ABSTRACT:

साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परांशी जवळचा संबंध दिसून येतो. सांस्कृतिक संदर्भातून साहित्य निर्माण होत असते. त्यामुळे साहित्य आणि संस्कृती यांचे दुहेरी नाते दिसून येते. भोवतालचे जग, अनुभव साहित्यिक आपल्या लेखणीतून मांडत असतो. समाजातील प्रथा, रूढी, परंपरा, रितीरिवाज या सर्व घटकांचा समावेश संस्कृतीमध्ये होत असतो. हे सर्व सांस्कृतिक संदर्भ साहित्यातून व्यक्त होत असतात. म्हणूनच संस्कृती ही साहित्याची सामग्री मानली जाते. तर भाषा हे संस्कृतीचे वाहन मानले जाते.

मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा मिलाफ साहित्य निर्मिती, प्रसार आणि वाचकांशी जोडणी यांसारख्या क्षेत्रांमध्ये होत आहे. तंत्रज्ञानामुळे साहित्यक्षेत्रात मदत झालेली दिसून येते. ऑनलाईन पुस्तकांची उपलब्धता, डिजिटल वाचनालये, सोशल मिडीयावरील साहित्य प्रसार शक्य झाला आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने नवीन साहित्य जसे की डिजिटल कथा तयार होत आहेत. प्रसारमाध्यमांच्याद्वारे विविध भाषांतील मजकूर भाषांतरित होऊन वाचक, श्रोत्यांपर्यंत पोहोचत असतो.भाषा, साहित्य, संस्कृती आणि अनुवादात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो.

माहिती तंत्रज्ञान म्हणजे योग्य अशी माहिती इंटरनेटच्या माध्यमाने सर्वत्र पोहोचविणे होय. मानवाने आपल्या अभिव्यक्तीसाठी भाषेमागचे तंत्रज्ञान सतत विकसित केले आहे. आजपर्यंत आपल्या मराठीचा विकास होत आलेला आहे. तंत्रज्ञानाने तर भाषा अधिकाधिक तीव्र गतीने बदलत जाते. परंतु आज माहितीचे आदानप्रदान करण्यासाठी विविध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर टाळणे शक्य होत नाही. त्यामुळे तंत्रज्ञानाचा व त्याबरोबर बदलत्या भाषेचा स्वीकार आपल्याला करावाच लागतो. संगणक, मोबाईल, इंटरनेट यासारख्या माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमांमध्ये इंग्रजीचा वापर मोठया प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे आपल्या मराठी भाषेतही इंग्रजी शब्दांचा वापर रोजच्या व्यवहारात होताना दिसतो. उदा. 'तू मला लगेच SMSकर',

'मी तुला email पाठवतो' इ. यासारखे अनेक इंग्रजी शब्द हे मराठी भाषेत सर्रास वापरले जातात. म्हणजेच तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच मराठी भाषाही बदलत गेली हे आपल्याला मान्य करावे लागते. तसेच काही कर्मवाचक इंग्रजी शब्द मराठी क्रियापदांबरोबर वाक्यात सहजपणे वापरले जातात. उदा. 'सिरियल लागली का?', 'पीडीएफ करून पाठव' या वाक्यांमध्ये कर्मवाचक शब्द हे इंग्रजी आहेत पण मराठी वाक्यांत ते सहजतेने वापरले जातात. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाची माध्यमे वाढत गेली आणि त्यातून अनेक नवीन शब्दांची भर आपल्या भाषेत पडत गेली.

**KEYWORDS:**

मराठी साहित्य, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल प्रकाशन, सोशल मीडिया, भाषा विकास.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय साधन सामुग्रीचा वापर केलेला आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट संशोधनपर साहित्य यांचा वापर केलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. तंत्रज्ञानामुळे साहित्यक्षेत्रात झालेली मदत अभ्यासणे.
2. विविध संकेतस्थळांच्या माध्यमातून मराठीतून मिळणाऱ्या माहितीचा अभ्यास करणे.
3. मराठीसाहित्यातील आधुनिक तंत्रज्ञान अभ्यासणे.

**विषय विवेचन:**

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. संगणक, संगणक प्रणाली, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, मोबाईल, ईमेल इ.च्या माध्यमातून आपण माहिती सोप्या पद्धतीने मिळवू शकतो. माहिती तंत्रज्ञानामुळे आज शिक्षण, शासनप्रशासन आणि अन्य क्षेत्रातही ऑनलाईन पद्धतींचा वापर करून गोष्टी सुलभ झालेल्या दिसून येतात. एका भाषेतील शब्दाला दुसऱ्या भाषेतील पर्यायी शब्द योजून ते दुसऱ्या

भाषेत वाक्यरचना करणे हे कला, कौशल्य असते. हे करत असताना दोन भाषा, समाज यांची भावनिक जोडणी करता येते. अनुवादातून भाषा, साहित्य, संस्कृती इत्यादींचे आदानप्रदान होत असते. त्यातून संस्कृती व भाषा समृद्ध होत असते. प्रसारमाध्यमांच्याद्वारे विविध भाषांतील मजकूर भाषांतरित होऊन वाचक, श्रोत्यांपर्यंत पोहोचत असतो. भाषा, साहित्य, संस्कृती आणि अनुवादात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो.

आजचे युग हे आधुनिक अशा तंत्रज्ञानाचे, प्रसारमाध्यमांचे युग आहे. आजच्या जीवनात आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे संगणक, मोबाईल, इंटरनेट हे झाले आहेत. या सर्व गोष्टी म्हणजे आपल्या रोजच्या वापराच्या गोष्टी झाल्या आहेत. ईमेल, एसएमएस, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर, इंटरनेटवरील विविध साईट्स यातून आपण रोजची अनेक कामे करत असतो. या गोष्टींचा अध्यापनातही आपण उपयोग करू शकतो. त्याद्वारे विद्यार्थ्यांना अधिकची माहिती मिळू शकते.

माहितीतंत्रज्ञानाचा उपयोग मराठीच्या विकासासाठी प्रभावीपणे करून घेतला पाहिजे. यादृष्टीने सर्व संगणकीय व्यवहार हे मराठीतून केले पाहिजेत. युनिकोड फॉण्टमुळे इंटरनेटवरील मराठी भाषेचा वापर सुलभ झाला आहे. १९ व्या आणि २० व्या शतकात जे ज्ञानकोश मराठीत आले त्यात अनेक लेखांचे विषय उपलब्ध आहेत. विकिपीडियावरून आपल्याला अनेक विषयांची माहिती मिळू शकते. ती माहिती मिळविण्यासाठी देखील आपण इंटरनेटवर युनिकोड मराठीचा वापर करून ती माहिती मिळवू शकतो. आज संगणकावरही आपल्याला युनिकोडमुळे देवनागरीत लिहिणे सोपे झाले आहे. त्यामुळे विकिपीडियासारख्या माध्यमातून मराठीतून ज्ञानसंक्रमण करणे सुलभ झाले आहे.

संगणक, इंटरनेट याबरोबरच सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळेदेखिल मराठीला नवे रूप मिळत आहे. आज फेसबुक, ट्विटर, व्हॉटसॲप यासारख्या संकेतस्थळांचा वापर जनमाणसात सर्रास होताना दिसतो. या संकेतस्थळांवर मराठीचा वापर होताना दिसतो. संवादाची जलद माध्यमे म्हणून यांचा वापर होत असतो. हा वापर होत असताना अनेक नवीन शब्द या माध्यमातून मराठी भाषेत वापरात येत

असतात. संगणकाचा किंवा तंत्रज्ञानाचा अडथळा कोणत्याही भाषेला ठरत नसतो. त्याचा फायदा तर भारतीय भाषांमधील वृत्तपत्रे, पुस्तके निर्मितीला झाला आहे. तसेच दूरचित्रवाणी, चित्रपट क्षेत्रालाही या तंत्रज्ञानाचा फायदा झालेला दिसतो. तिथेही मराठी भाषेचा वापर होताना दिसतो.

**साहित्यनिर्मितीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर:**

1. डिजिटल लेखन – साहित्यनिर्मिती करताना लेखक आता तंत्रज्ञानाचा वापर करतात. जसे की संगणकावर लिहिणे, ऑनलाईन संपादन साधने वापरणे. यातून डिजिटल कथा यासारख्या कथा तयार होत आहेत.
2. ऑनलाईन वाचनालये –ebook, ईपुस्तके आणि डिजिटल साहित्याची उपलब्धता वाढल्यामुळे लोकांना ऑनलाईन स्वरुपात साहित्य सहज उपलब्ध होते, वाचता येते.
3. सोशल मिडिया – फेसबुक, ब्लॉग्ज आणि इतर डिजिटल माध्यमांवर लेखक आपली लिंक प्रसारित करीत असतात. त्यातून ते साहित्य वाचकांपर्यंत पोहोचू शकते. वाचकांशी संवाद साधता येतो. त्यामुळे साहित्य लोकांपर्यंत पोहोचणे सोपे झालेले दिसून येते.
4. डिजिटल प्रकाशन – प्रकाशक आता तंत्रज्ञानाचा वापर करून पुस्तके डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहेत. त्यामुळे जगात कुठेही पुस्तके सहजरीत्या उपलब्ध होऊ शकतात.

एखाद्या भाषेतील ज्ञान, विज्ञान नवनवीन शोध हे अनुवादामुळे दुसऱ्या भाषिकांपर्यंत पोहोचू शकतात. अनुवाद करताना सर्वसामान्य लोकांची बोलीभाषा, कृषी, वैद्यकीय, विद्युत, अभियांत्रिकी इ. क्षेत्रातील भाषेची योग्य जाण असावी लागते. त्यासाठी शब्दसंग्रह, शब्दकोश, परिभाषा कोश, माहिती तंत्रज्ञान यांचा सतत अभ्यास असावा लागतो. आपल्या भाषेचा अधिक परिणामकारक वापर करताना संगणक, मोबाईल, इंटरनेट यासारख्या माहिती तंत्रज्ञानाची मदत झालेली दिसून येते.

आज इंटरनेटवर मराठी भाषेतील विविध प्रकारची माहिती देणारी अनेक संकेतस्थळे दिसून येतात. त्यांच्या माध्यमातून बरीचशी माहिती मिळवता येते. शासनाचा व्यवहार कोश, मराठी विश्वकोशाचे खंड, अनेक पुस्तके इंटरनेटवर उपलब्ध आहेत. त्याचा वापर करून

आपण आपल्या भाषेच्या ज्ञानात भर घालू शकतो. इंटरनेटवर अनेक भाषिक संसाधने उपलब्ध आहेत. मराठीतील अनेक संत, साहित्यिक यांचे जीवन व त्यांच्या साहित्यकृती यांची माहिती विविध संकेतस्थळावरून मिळू शकते. त्याचबरोबर मराठीतील विविध ग्रंथ, दिवाळी अंक, नियतकालिके, मराठी कविता, गाणी, बोधकथा हे सर्व आपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने वाचू, ऐकू, पाहू शकतो. इंटरनेटवर माहितीचे भांडार उपलब्ध असलेले दिसून येते. दूरदर्शन, व्हिडीओ, दूरध्वनी, मोबाईल फोन, ईमेल, ब्लॉग, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग यासारख्या माध्यमांचा योग्य असा वापर करून आपल्याला बरीचशी माहिती मिळू शकते.

साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परांशी जवळचा संबंध दिसून येतो. सांस्कृतिक संदर्भातून साहित्य निर्माण होत असते. त्यामुळे साहित्य आणि संस्कृती यांचे दुहेरी नाते दिसून येते. भोवतालचे जग, अनुभव साहित्यिक आपल्या लेखणीतून मांडत असतो. समाजातील प्रथा, रूढी, परंपरा, रितीरिवाज या सर्व घटकांचा समावेश संस्कृतीमध्ये होत असतो. हे सर्व सांस्कृतिक संदर्भ साहित्यातून व्यक्त होत असतात. म्हणूनच संस्कृती ही साहित्याची सामग्री मानली जाते. तर भाषा हे संस्कृतीचे वाहन मानले जाते.

सामाजिक प्रसारमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे मराठी भाषेला नवे रूप मिळत आहे. ईमेल, विकिपीडिया, ब्लॉग्ज इ. माध्यमातून संगणकावर मराठी भाषेचा वापर वाढलेला दिसून येतो. विकिपीडियासारख्या माध्यमामुळे विविध खेत्रातील माहिती आपल्याला मिळू शकते. इंग्रजी लेखनातील न समजलेले संदर्भ मराठीत शोधता येतात. मराठी ब्लॉग्जच्या माध्यमातून मराठी भाषेचा वापर वाढलेला दिसून येतो. या सर्व गोष्टी अभ्यासक, स्पर्धापरीक्षा, विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी उपयुक्त असलेला दिसून येतो.

१९९८ मध्ये सर्वप्रथम डायनॅमिक फॉन्ट वापरून वृत्तपत्रीय संकेतस्थळ 'लोकमतचे' सुरु झाले. 'ऐसी अक्षरे' या नावाच्या संकेतस्थळावरूनही मराठी लेख प्रसिद्ध होऊ लागले. मनोगत, उपक्रम, मिसळपाव, माझे शब्द यासारखी मराठी संकेतस्थळे सुरु झाली. इंटरनेटवरील संकेतस्थळांवरून मराठीचे अनेक लेख, माहिती आपल्याला

मिळू शकते. या संकेतस्थळांच्या माध्यमातून मराठीतून मिळणारी माहिती वाढली आहे.

**समारोप:**

संगणक, इंटरनेट याबरोबरच सोशल मिडियाच्या वाढत्या वापरामुळे मराठीला नवे रूप मिळत आहे. आज फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप यासारख्या संकेतस्थळांचा वापर जनमाणसात सर्रास होताना दिसतो. संवादाची जलद माध्यमे म्हणून यांचा वापर होत असतो. हा वापर होत असताना अनेक नवीन शब्द या माध्यमातून मराठी भाषेत वापरात येत असतात. आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या, संगणकाच्या युगात भाषेच्या विकासासाठी, प्रसारासाठी संगणकावर भाषेचा वापर वाढणे गरजेचे असलेले दिसून येते. त्याचबरोबर प्रसारमाध्यमे, आकाशवाणी, वृत्तवाहिन्या यातूनही मराठीचा वापर वाढत गेला पाहिजे. कारण ह्या प्रसारमाध्यमांच्याद्वारे समाजमनावर मोठा परिणाम होत असतो. त्यामुळे या माध्यमांतूनही मराठी भाषेचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे.आधुनिक तंत्रज्ञानाचा अडथळा कोणत्याही भाषेला ठरत नसतो. तर त्याचा फायदा वृत्तपत्रे, पुस्तके निर्मितीला झाला आहे. मराठीतील ब्लॉग्ज, पोर्टल्स यावर अनेक विषयातील लेख मराठीतून असलेले आपल्याला दिसतात. आज मोबाईलवरही मराठीचा वापर वाढलेला दिसतो. अशावेळी तंत्रज्ञान बाजूला करून चालणार नाही. तर आपल्या भाषिक व्यवहारासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे. आपली भाषा समृद्ध करण्यासाठी त्याचा उपयोग होत राहील.

**निष्कर्ष:**

1. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण मराठी भाषेतून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग करून घेतला पाहिजे.
2. मराठीच्या विकासासाठी या तंत्रज्ञानांचा प्रभावीपणे उपयोग करून घेणे गरजेचे आहे.
3. आधुनिक काळात मराठीतील ब्लॉग्ज, पोर्टल्स यावर अनेक विषयातील लेख मराठी भाषेतून दिसतात. त्यामुळे मराठी भाषेतील प्रचंड मोठे ज्ञान व माहितीसंग्रह मिळताना दिसतो.

4. मराठी भाषेतील अनेक नवे शब्द, शब्दसंग्रह उपलब्ध करून देणाऱ्या संकेतस्थळांचा वापर केला पाहिजे.
5. आपल्या भाषेचा अधिक परिणामकारक वापर, उपयोग करत असताना संगणक, मोबाईल, इंटरनेट यासारख्या माहिती तंत्रज्ञानाची मदत झाली असे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

1. https://www.esakal.com
2. https://mr.vikaspedia.in

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.